# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.01.2025** **वारःसोमवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज विविध रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन
2. जागतिक स्तरावर आरोग्याची राजधानी होण्याची भारताची क्षमता-पंतप्रधानांचे गौरवोद्गार
3. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि अमेरिकेचे सुरक्षा सल्लागार जेक सुलीवान यांच्यात आज चर्चा आणि
4. अमेरिकेत हिमवादळाचा अंदाज; तर उत्तर भारतात थंडीचा जोर वाढला

**<u>पंतप्रधान</u>**

रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुरस्थ माध्यमातून आज होणार आहे. देशभरांतील दळणवळण सुविधेला चालना देण्याच्या उद्देशानं सुरु केलेल्या या उपक्रमांत नव्या जम्मू रेल्वे विभागांचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. तसंच तेलंगणातील चारलापल्ली नवीन टर्मिनल स्टेशनचे उद्घाटन आणि पूर्व किनारपट्टी रेल्वेच्या रायगडा रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>दिल्ली-पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल दिल्ली शहरासाठीच्या 12 हजार 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन तसंच पायाभरणी करण्यात आली. दिल्ली-गाझियाबाद-साहिबाबाद आणि न्यू अशोक नगर दरम्यान दळणवळण क्षमता वाढवणं, नमो भारत कॉरिडोरच्या 13 किलोमीटर लांबीच्या प्रकल्पांसह अनेक विकासकामांचा यामध्ये समावेश आहे. नमो भारत प्रकल्प पूर्ण झाल्यावर दिल्ली-मेरठ मार्गावरील वाहतुकीत लक्षणीय बदल होईल असं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले. आता दिल्लीपासून विविध शहरांमध्ये एक्सप्रेसवे तयार होत आहेत आणि दिल्ली औद्योगिक कॉरिडॉरशी जोडली जात आहे. यामुळे शहराची दळणवळण क्षमता वाढेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<u>पंतप्रधान-आयुर्वेद संशोधन</u>**

जागतिक स्तरावर चांगल्या आरोग्य सुविधा देणारी आरोग्याची राजधानी होण्याची क्षमता भारताकडे आहे, मेक इन इंडियाच्या धर्तीवर, जग लवकरच हील इन इंडिया हा मंत्र स्वीकारेल असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं काढले. दिल्लीतील, केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्थेच्या नव्या इमारतीची पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते काल दूरस्थ पद्धतीने करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या प्रत्येक

नागरिकांपर्यंत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर सरकारने लक्ष केंद्रीत केलं असून, आयुष आणि आयुर्वेद यांच्या माध्यमातून पारंपरीक भारतीय औषध व्यवस्थेला प्रोत्साहन देत असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं. आयुष प्रणाली 100 हून अधिक देशांमध्ये पोहचली असून, जागतिक आरोग्य संघटनेची, पारंपरिक उपचारपद्धतीशी निगडीत पहिली संस्था भारतात स्थापन होत असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते.  या इमारतीसाठी 185 कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, एकंदर तीन एकर परिसरात याची उभारणी होणार आहे. इथे पारंपरिक उपचारपध्दती आणि नाविन्याचा मेळ असलेली सर्वांगिण उपचारपध्दती उपलब्ध होणार आहेत.

**<u>पॅरासिटमॉल</u>**

पॅरासिटमॉल या वेदनाशामक आणि तापावरील उपचारासाठी वापरण्यात येणाऱ्या औषधाची निर्मिती करण्यासाठी भारतीय विज्ञान आणि औद्योगिक विकास प्राधिकरण अर्थात CSIR नं नवं तंत्रज्ञान विकसित केलं आहे अशी घोषणा विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी काल नवी दिल्ली इथं केली. CSIR च्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांत ते बोलत होते. भारताला पॅरासिटामॉल निर्मितीमध्ये आत्मनिर्भर बनवणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. भारतातील पहिल्या स्वदेशी विकसित प्रतिजैविक असलेल्या नॅफिथ्रोमायसिन औषध टिपीकल आणि अटिपिकल अशा दोन्ही प्रकारच्या जीवाणूंवर उपचार करण्यासाठी वापरले जाते.

**<u>हेलिकॉप्टर</u>**

भारतीय तटरक्षक दलाचं हेलिकॉप्टर काल गुजरातमधील पोरबंदर विमानतळाच्या धावपट्टीवर अपघातग्रस्त झालं; या दुर्घटनेत तटरक्षक दलाच्या तीन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. दोन वैमानिक आणि एक डायव्हर असे तिघे नियमित सराव करत असताना ही दुर्घटना घडली. या घटनेच्या चौकशीसाठी एका समितीची स्थापना करण्यात आल्याची माहिती भारतीय तटरक्षक दलानं निवेदनाद्वारे दिली आहे.

**<u>अजित-डोवाल</u>**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि अमेरिकेचे सुरक्षा सल्लागार जेक सुलीवान यांच्यादरम्यान आज नवी दिल्ली इथं बैठक होणार आहे. सध्या आव्हान असलेले मुद्दे आणि नव्या तंत्रज्ञान अर्थात iCET तसंच दोनही देशांदरम्यानच्या इतर द्विपक्षीय मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध व्यापक आहेत, सध्याच्या अमेरिकन प्रशासनचा कार्यकाळ संपत असला तरी, या काळातही द्विपक्षीय संबंध दृढ करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत आणि अशा भेटींमधून दोनही देशांदरम्यानच्या चांगल्या संबंधांची ताकद दिसून येते. असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयवाल यांनी या भेटीबद्दल बोलताना गेल्या आठवड्यात प्रसारमाध्यमांना सांगितलं होतं.

**<u>सीरिया</u>**

अमेरिकेनं सीरियावर लादलेले निर्बंध उठवण्याची विनंती सीरियाचे परराष्ट्र मंत्री असद हसन अल-शिबानी यांनी केली आहे. सिरीयातील सामान्य नागरिकांचं जीवनमान पुर्वपदावर आणण्यासाठी हे निर्बंध शिथील कारावेत असं कतारच्या राजनैतिक भेटीदरम्यान ते म्हणाले. कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री यांची त्यांनी काल भेट घेतली त्यावेळी ते बोलत होते. माजी अध्यक्ष बशर अल-असाद यांना बंडखोरीतून पायउतार व्हावं लागलं होतं मात्र

त्यानंतर आता सीरियाचे अधिकारी आंतरराष्ट्रीय समर्थन मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. असद हसन अल-शिबाली या आठवड्यात संयुक्त अरब अमिराती आणि जॉर्डनला भेट देण्याची शक्यता आहे. अशी माहिती X माध्यमातून त्यांनी दिली आहे.

**जागतिक-बँक**

पाकिस्तानातील राजकीय अस्थिरतेच्या काळात विकास प्रकल्पांना संरक्षण देण्यासाठी तसंच पाकिस्तानच्या सर्वात दुर्लक्षित क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशानं जागतिक बँक 14 जानेवारी रोजी 20 अब्ज अमेरिकन डॉलर्सचे कर्ज मंजूर करणार आहे, जागतिक बँकेचे दक्षिण आशियासाठीचे उपाध्यक्ष मार्टिन रायसर इस्लामाबादला भेट देणार आहेत.

**अफगाणिस्तान**

अफगाणिस्तानातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी स्फोट न झालेल्या शस्त्रास्त्रे आणि युद्धात वापरात आलेल्या अवशेषांचा स्फोट होऊन झालेल्या अपघातांमुळे 500 पेक्षा अधिक लहान मुलांचा मृत्यू झाला असून काही मुलं जखमी झाली असल्याची माहिती UNICEFनं समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे. आतापर्यंत 3 दशलक्ष मुलं आणि त्यांच्या पालकांना स्फोटकांचे धोके कसे ओळखावे आणि कसे टाळावे याचे प्रशिक्षण देण्यात आलं असल्याचं युनिसेफनं सांगितलं. निधीच्या कमतरतेमुळे अफगाणिस्तानमधील 14 दशलक्ष गरिबीरेषेखाली असलेल्या नागरिकांपैकी 7 दशलक्ष लोकांनाच मदत देऊ शकते. अशी माहिती एका डब्ल्यूएफपीच्या आपत्कालीन विभागाच्या प्रमुख, पॉलीन एलॉफ यांनी सामजमाध्यमावरील संदेशात दिली आहे.

**मुंबई औषधे**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर अमली पदार्थ नियंत्रण विभागानं तस्करी होत असलेले अमली पदार्थ जप्त केले. यात 74 हजार कॅप्सूल तसंच अडीच लाख बनावट सिगारेटचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय तस्करांकडून मोठ्या प्रमाणात औषधांची तस्करी होत असल्याची माहिती नियंत्रण विभागाला मिळाली होती. त्याआधारे विमानतळावर ही कारवाईत करण्यात आली. या प्रकरणी दोन कुरिअर आणि मालवाहतूक कंपन्यांची चौकशी सुरू आहे.

**हॉकी साखळी**

भारतीय हॉकी संघटनेच्या वतीन आयोजित साखळी सामन्यात, काल तामिळनाडू ड्रॅगन्सनं युपी रूद्रास संघाचा 2-0 ने धुव्वा उडवत पहिल्या विजयाची नोंद केली. त्यामुळे गुणतालिकेत तामिळनाडू तिसऱ्या स्थानावर आहे. अभारन सुदेव आणि थॉमस सॉर्स्बी यानं तामिळनाडूसाठी प्रत्येकी एक गोल केला. तत्पुर्वी झालेल्या सामन्यात सूरमा हॉकी क्लबने गतविजेत्या वेदांत कलिंगा लान्सर संघाचा 4-3 असा पराभवर केला. आज संध्याकाळी सूरमा हॉकी क्लबचा सामना दिल्ली एसजी पायपर्सशी होणार आहे.

**फुटबॉल साखळी**

भारतीय फुटबॉल साखळी सामन्यात काल दिल्लीत झालेल्या सामन्यात केरळ ब्लास्टर्सनं पंजाब एफसी संघाचा 1-0 असा पराभव केला. सामन्यावर पंजाबच्या संघाचं वर्चस्व राखले होते तरीही त्यांना त्याचं गोलमध्ये

रुपांत करता आलं नाही. या विजयामुळे केरळ ब्लास्टर्स नवव्या स्थानी पोचला असून, पंजाब एफसी हा चौथा पराभव आहे. पंजाब 18 व्या स्थानावर आहे. आज संध्याकाळी कोलकाता इथं ईस्ट बंगाल एफसीचा मुकाबला मुंबई सिटी एफसीशी होणार आहे. साखळीत मुंबई सातव्या तर ईस्ट बंगाल 11 व्या स्थानी आहे. 12 मार्चला साखळी फेरीची सांगता होणार आहे.

**<u>अमेरिका</u>**

अमेरिकेच्या कॅन्सस, मिसूरी आणि इंडियाना सारख्या राज्यांमध्ये हिमवादळाची शक्यता असून सुमारे 60 दशलक्ष लोकांना या हिमवादळाचा तडाखा बसू शकेल असा इशारा अमेरिकेच्या नॅशनल वेदर सर्व्हिसनं दिला आहे. या हिमवादळामुळे ताशी 50 मैल वेगाने वारे वाहण्याची शक्यता लक्षात घेता या भागातून प्रवास करताना काळजी घ्यावी असा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

**<u>हवामान</u>**

देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढत असून येत्या 4-5 दिवसांत जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान आणि मुझफ्फराबादमध्ये किमान तापमान 4-5 अंश सेल्सिअसने घसरण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. हिमाचल प्रदेशच्या वेगळ्या भागांमध्ये आज वादळ आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**